DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दूरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 04 एप्रिल 2021.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 05 एप्रिल 2021.
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 05 एप्रिल 2021.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 06/04/2021.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊनच्या कालावधीत दि. 30 एप्रिल 2021 पर्यंत करावयाच्या कार्यवाहीबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार संदर्भ क्र. 5 अन्वये या कार्यालयाने आदेश जारी केला आहे. ज्याअर्थी संदर्भ क्र. 6 अन्वये महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. 4 अन्वये दिलेल्या आदेशातील मार्गदर्शक सूचनांमध्ये वाढ करून नविन वाढीव मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

**त्याअर्थी संदर्भ 6 मधील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन संदर्भ क्र. 5 च्या या कार्यालयाच्या आदेशामध्ये खालील नविन मुद्द्यांचा/बार्बीचा समावेश करण्यात येत आहे.**

1. **संदर्भ क्र. 1 च्या आदेशामध्ये नमूद करण्यात आलेल्या अत्यावश्यक सेवांमध्ये खालील नमूद बाबींचा समावेश करण्यात येत आहे.**
   a) पेट्रोल पंप व पेट्रोलियम संबंधित उत्पादने (पेट्रोल पंप व पेट्रोलियम संबंधित उत्पादने यांचा अत्यावश्यक सेवांमध्ये समावेश झाला असल्याने संदर्भ क्र. 5 च्या आदेशातील मुद्दा क्र. 20 नुसार न.प./न.पा./न.पं. हद्दीतील पेट्रोल पंपांकरिता लागू करण्यात आलेला नियम याद्वारे रद्द करण्यात येत आहे.)
   b) सर्व मालवाहतूक सेवा
   c) Data Centers/Cloud Service Providers/ IT services supporting critical infrastructure and services.



Scanned by CamScanner

d) शासकीय व खाजगी सुरक्षा सेवा (Security Services).

e) फळ विक्रेते.

2. खालील नमूद खाजगी संस्थांमध्ये काम करणारे सर्व व्यक्तींनी भारत सरकारने निश्चित केलेल्या नियमांनुसार तात्काळ लसीकरण (Vaccination) करुन घेण्याच्या आणि लसीकरण पूर्ण होईपर्यंत कोरोना निगेटिव्ह असलेबाबतचे 15 दिवसापर्यंत वैध असलेले आरटीपीसीआर/अँटीजेन प्रमाणपत्र सोबत बाळगण्याच्या अटीवर या संस्था सोमवार ते शुक्रवारी सकाळी 7 ते रात्री 8 य वेळेमध्ये चालू ठेवण्यास परवानगी राहील. उक्त नमूद केलेले आवश्यक प्रमाणपत्र सोबत नसल्यास उल्लंघन करणा-यास रु. 1000/- इतका दंड आकारण्यात येईल.

a) सेबी (SEBI) व त्यांची कार्यालये (stock exchanges, depositories and clearing corporations and intermediaries registered with SEBI)

b) RBI द्वारे नियंत्रित केल्या जाणा-या संस्था व मध्यस्थी करणा-या संस्था (intermediaries including standalone primary dealers, CCIL, NPCI, payment system operators) आणि RBI द्वारे नियंत्रित केल्या जाणा-या बाजारांमध्ये काम करणारे सर्व आर्थिक बाजारातील भागीदार.

c) सर्व बँकींग सेवा न देणा-या वित्तीय संस्था (All Non-Banking Financial Corporations)

d) सर्व सूक्ष्म वित्तीय संस्था (All Micro Finance Institutions)

e) विधीज्ञांची कार्यालये (Offices of Advocates)

f) लस (Vaccines)/जिवनावश्यक औषधे (lifesaving drugs)/औषधी उत्पादने (Pharmaceutical products) यांच्याशी संबंधित असणारे परवानाधारक वाहतूकदार (Licensed Multi Modal Transport Operators) व कस्टम हाऊस एजंट्स

3. सोमवार ते गुरुवारी रात्री 8 ते सकाळी 7 व शुक्रवारी रात्री 8 ते सोमवारी सकाळी 7 या वेळेमध्ये येणा-या/जाणा-या रेल्वे/बस/विमाने यांमध्ये प्रवास करणा-या प्रवाशांना रेल्वेस्थानक/बस स्थानक/विमानतळ याठिकाणी किंवा तेथून त्यांचे घराकडे जाण्यासाठी त्यांचेकडे असणा-या वैध टिकिटाचे आधारावर संचार/प्रवास करण्याची परवानगी राहील.

4. उद्योगांमध्ये काम करणारे जे कामगार सोमवार ते गुरुवारी रात्री 8 ते सकाळी 7 व शुक्रवारी रात्री 8 ते सोमवारी सकाळी 7 या वेळेमध्ये खाजगी बस/खाजगी वाहनाने कामावर जात असतील तर त्यांना त्यांचेकडील ओळखपत्राचे आधारावर संचार/प्रवास करण्याची परवानगी राहील.

5. धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळे सद्यस्थितीत भाविकांसाठी बंद करण्यात आलेली आहेत. केवळ धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळांच्या व्यवस्थापनामधील संबंधित व्यक्तींना नित्य पुजा, दिवाबत्ती, साफसफाई करण्याची परवानगी आहे. एखाद्या प्रसंगी कोणतेही विवाह/अंत्यविधी विषयक कार्यक्रम धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळांच्या ठिकाणी असल्यास या कार्यालयाचे दि. 05 एप्रिल 2021 मध्ये नमूद विवाह/अंत्याविधी विषयक कार्यक्रमांकरिता निश्चित करण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येईल.

6. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेकरीता प्रत्यक्षपणे संबंधित केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे अशा विद्यार्थ्यांना परीक्षाकेंद्रावर व तेथून घरी जाण्याकरिता त्यांचेकडील वैध परीक्षा प्रवेशपत्राचे आधारे सोमवार ते गुरुवारी रात्री 8 ते सकाळी 7 व शुक्रवारी रात्री 8 ते सोमवारी सकाळी 7 या वेळेमध्ये संचार/प्रवास करण्याची परवानगी राहील.

7. जे विवाहसमारंभ शुक्रवारी रात्री 8 ते सोमवारी सकाळी 7 या वेळेमध्ये निश्चित करण्यात आलेले असतील त्यांना स्थानिक परिस्थितीचा विचार करुन या कार्यालयाचे दि. 05 एप्रिल 2021 मध्ये नमूद विवाह/अंत्यायात्रा विषयक कार्यक्रमांकरिता निश्चित करण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्याच्या अटीवर परवानगी देण्याचे अधिकार Incident Commander तथा तहसिलदार यांना राहतील.



Scanned by CamScanner

8. स्थानिक परिस्थितीचा विचार करून घरगुती मदतनीस/वाहनचालक/स्वयंपाकी यांना सोमवार ते गुरुवारी रात्री 8 ते सकाळी 7 व शुक्रवारी रात्री 8 ते सोमवारी सकाळी 7 या वेळेमध्ये काम करण्यासाठी परवानगी देण्याचे अधिकार Incident Commander तथा तहसिलदार यांना राहतील.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 05/04/2021 रोजी रात्री 08.00 पासून तात्काळ लागू करण्यात येत असून सदर आदेश दि. 30 एप्रिल 2021 रोजी रात्री 11.59 वाजेपर्यंत लागू राहील. तसेच या कार्यालयाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश लागू राहतील.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
6. अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
7. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
8. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
9. विभाग नियंत्रक रा. प. उस्मानाबाद.
10. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
11. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
13. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद.
14. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
15. तहसिलदार तथा व्यवस्थापक, श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर.
16. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व जिल्हा उस्मानाबाद.
17. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
18. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner